क्रमांक-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/[illegible]/२००६. 820

शिक्षण मंडळ कार्यालय,

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८.

दिनांक :- १२/९/२००६.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे

प्रथम शाळा. मोशी.

विषय :- मान्यताप्राप्त विनाअनुदानित/अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांतील नैसर्गिक वाढीचे प्रथम वर्ग मंजूरी बाबत...

संदर्भ :- मा.शिक्षण उपसंचालक,पुणे यांचेकडील पत्र क्र.प्रा/प्राशि/खाप्राशा/तु.मा/पुदि/८२९३/७५/०६ दिनांक १७/४/२००६.

उपरोक्त संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आपल्या शाळेस खाली नमूद इयत्तांच्या नैसर्गिक तुकड्या वर्गांना खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ नैसर्गिक का | विनाअनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|---|---|
| १) | पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे प्रा.शाळा,मोशी ( नुतनीकरणाने परवानगी) | मराठी | इ.२री<br>इ.३री<br>इ.४थी | नैसर्गिक<br>नैसर्गिक<br>नैसर्गिक | विनाअनुदान तत्वावर सन २००३<br>विनाअनुदान तत्वावर सन २००४<br>विनाअनुदान तत्वावर सन २००५ |
| २) | शिक्षण प्रसारक मंडळी,मराठी माध्यम शाळा, यमुनानगर,निगडी | मराठी | इ.२री<br>इ.३री<br>इ.४थी | नैसर्गिक<br>नैसर्गिक<br>नैसर्गिक | विनाअनुदान तत्वावर सन २००१<br>विनाअनुदान तत्वावर सन २००२<br>विनाअनुदान तत्वावर सन २००३ |
| ३) | बा.रा.घोलप प्राथ.शाळा,सांगवी (नुतनीकरणाने परवानगी) | मराठी | इ.२री<br>इ.३री<br>इ.४थी | नैसर्गिक<br>नैसर्गिक<br>नैसर्गिक | विनाअनुदान तत्वावर सन २००३<br>विनाअनुदान तत्वावर सन २००४<br>विनाअनुदान तत्वावर सन २००५ |

शाळेने सदरचे वर्ग अथवा तुकडी मंजुरीसाठी खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.(एस.एस.सी.डी.एड)

२) सदर शाळेने तुकड्यांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.

३) सदर शाळेने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावयास हवी.

४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६) सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एका महिन्यात सादर करावा.

(सही)

प्रशासन अधिकारी,

शिक्षण मंडळ,

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी-१८

S N Kolkar

प्रत - माहितीसाठी.

१) मा.शिक्षण उपसंचालक

पुणे विभाग पुणे १.

(सही)

मुख्याध्यापक

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे

प्राथमिक विद्यालय मोशी

ता. हवेली, जि. पुणे.